# पितृसत्ताक पद्धती आणि स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन

**डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार**

*ज.जि.म.वि.प्र. सह. समाजाचे, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,जळगाव.*

*padalwarsaheb@gmail.com 9850560527*

## गोषवारा

*पितृसत्ताक पद्धती अनेक समाजव्यवस्थांत आजही रुजलेली दिसते, त्यामुळे स्त्रियांच्या शोषणास सर्रास अधिमान्यता मिळते. समाजातील सर्व घटकांमध्ये पुरुषी वर्चस्व असल्याने हा भेद कधी संपतच नाही;पितृसत्ताक व्यवस्था म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था जिथे पुरुष स्त्रियांचे सर्व पद्धतींनी शोषण करतात. त्यात त्यांना कमी दर्जाची वागणूक दिली जाते व सर्व निर्णय पुरुषांच्या हाती असतात आणि ही व्यवस्था संस्थात्मक असते. पुरुषप्रधानता व पुरुषांकडून नियंत्रण ही त्याची वैशिष्ट्ये सांगता येतील. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत संपूर्ण सत्ता व व्यवहार कुटुब प्रमुखाकडे म्हणजेच म्हणजेच पित्याकडे असतात या पद्धतीत संपूर्ण कुटुंबाच्या व्यवहारावर कुटुंबप्रमुखाचा प्रभाव दिसून येतो तर त्याच्या अगदी उलट व्यवहार मातृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये दिसून येतात, मातृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये स्त्री ही कुटुंब प्रमुख असते व सर्व व्यवहारावर नियंत्रण हे त्या स्त्रीचे असते. मात्र सद्यकालीन स्थितीमध्ये आपणास मातृसत्ताक कुटुंबपद्धती चे अस्तित्व म्हणावे तेवढे दिसून येत नाही. अगदीच काही आदिवासी जमातींमध्ये ही कुटुंब पद्धती अस्तित्वात आहे*

*पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये स्त्रियांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे दिसून येते.आज आपण जरी म्हणत असलो की स्त्री - पुरुष समानता आहे तरीपण आजही स्त्री स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करताना दिसून येते. अगदी प्राचीन कालखंडापासून ते आजपर्यंत जर आपण स्त्रियांचे समाजातील स्थान आणि कुटुंबातील स्थान जर बघितले तर आपणास असे निदर्शनास येते की हे दुय्यम स्वरूपाचेच आढळून येते. वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांना शिक्षणाचा हक्क दिसून येतो वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांची स्थिती ही बऱ्यापैकी चांगली होती पण त्यानंतर मात्र पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात धन्यता मानलेली आपणास दिसून येते. ऋग्वेदामध्ये मुलाचा जन्म व्हावा यासाठी प्रार्थना केल्याचे उल्लेख सापडतात परंतु माझ्या पोटी मुलीने जन्म घ्यावा यासाठी कोणी प्रार्थना केल्याचा एकही सूचक उल्लेख कुठेच आढळून येत नाही. त्यामुळे स्त्रिया उत्तर वैदिक कालखंडात तिचे सर्व हक्क व मते गमावून बसली, त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न निर्माण झाला स्त्रियांना त्यांच्या अधिकारांसाठी स्वातंत्र्यासाठी समान वागणूक मिळावी या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागला आता त्या संघर्षाचा परिणाम कुठेतरी दिसावयास सुरुवात झालेली आहे आणि स्त्री चळवळीला यश येताना दिसत आहे.*

## ➢ शोधनिबंधाची उद्दिष्टे

✓ पितृसत्ताक व मातृसत्ताक कुटुंब पद्धतीची संकल्पना स्पष्ट करणे

✓ भारतातील स्त्री वर्गाची सामाजिक स्थिती स्पष्ट करणे

✓ स्त्रियांच्या मानवी हक्कासंबंधी संकल्पना स्पष्ट करणे

## ➢ गृहितके

भारतातील समाजधुरिणांनी धर्म व पितृसत्ताक पद्धतीची चौकट मोडून स्त्रीमुक्तीची संकल्पना मांडली या संकल्पनेला सर्व स्तरातून पाठिंबा मिळाला.

## ➢ संशोधन पद्धती

या शोधनिबंधात साठी ऐतिहासिक संशोधन पद्धती स्वीकारली असून त्याप्रमाणे शोधनिबंधाचे लेखन केले आहे व संदर्भासाठी दुय्यम प्रकाशित साधनांचा उपयोग केला आहे.

## ➢ प्रस्तावना

भारतात प्रामुख्याने पितृसत्ताक कुटुंबपद्धती आढळते. "ज्या कुटुंबात पिता किंवा भाऊ कुटुंबप्रमुख असतो वंश पित्याच्या नावाने चालतो. कुटुंबातील स्त्रियांचा दर्जा दुय्यम असतो. पत्नी विवाहानंतर पतीच्या घरी राहावयास येते अशा कुटुंबास पितृसत्ताक कुटुंब असे म्हणतात "1 ही कुटुंबे पितृस्थानी असतात या कुटुंबात पित्याचा म्हणजेच कर्त्यांचा शब्द अखेरचा मानला जातो आणि त्यानंतर वयाने ज्येष्ठ असणाऱ्या पुरुषाकडे परंपरेने हे अधिकार संक्रमित केले जातात. पितृस्थानी त्यामुळे त्यात पिता माता त्यांची मुले आणि काही वेळा त्यांच्या मुलांची मुले एकत्र राहतात. "पितृसत्ताक व्यवस्था म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था जिथे पुरुष स्त्रियांचे सर्व पद्धतींनी शोषण करतात. त्यात

त्यांना कमी दर्जाची वागणूक दिली जाते व सर्व निर्णय पुरुषांच्या हाती असतात आणि ही व्यवस्था संस्थात्मक असते."2 पुरुषप्रधानता व पुरुषांकडून नियंत्रण ही त्याची वैशिष्ट्ये सांगता येतील. यामध्ये पुरुष श्रेष्ठ व शोषक असतो. स्त्रिया खालच्या दर्जाच्या मानलेल्या असतात. पुढच्या पिढीला मूल्यशिक्षण देण्याचे काम ही कुटुंब संस्था करीत असते. यामध्ये आम्ही श्रेष्ठ-कनिष्ठ, पदानुक्रम आणि लिंगाधारित भेदभावांचा धडा शिकत असतो.

स्त्रिया जगाच्या लोकसंख्येचा अर्धा हिस्सा आहेत. असे असूनही स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन आणि लिंगाधारित हिंसा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भारतात करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार दर २४ मिनिटांना एक स्त्री लैंगिक शोषण, दर ४३ मिनिटांना अपहरण आणि दर ५४ मिनिटांना बलात्काराची बळी पडत असते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दर आठ सेकंदांना एक स्त्री लैंगिक शोषणाला आणि सहा मिनिटांना एक स्त्री बलात्काराला सामोरी जात आहे. या आकडेवारीवरून जगभर स्त्रियांच्या मानवी हक्कांचे किती मोठ्या प्रमाणात हनन केले जाते याचे भयावह चित्र दिसून येते.

**➢ भारतातील स्त्रियांचे समाजातील स्थान**

विसाव्या शतकाच्या आरंभी स्त्रियांच्या समस्यांच्या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा व्हायला सुरुवात झाली स्त्रीवादी या नावाने एक नवीन विचार प्रवाह आणि चळवळ सक्रिय झाली विदेशात प्रारंभ झालेली ही चळवळ भारतात देखील हळुवार पावलांनी दाखल झाली भारतात प्रत्येक क्षेत्रात नाट्यगीत, शिल्प, चित्र ,पुस्तके , वर्तमान, टीव्ही व प्रसारमाध्यमात अनेक कलाकृतीत स्त्री हाच प्रमुख विषय मांडलेला असायचा आणि त्यातूनच कळत नकळत फक्त स्त्रियांच्या स्थानाचा दर्जा खालावत गेला. त्याचं कारण असे कि, समाजात असलेली स्त्रियांचे व्यक्तींचे स्थान म्हणजेच त्या व्यक्तीचा दर्जा होय. स्त्रियांचे समाजातील स्थान समजून घेण्यासाठी त्यांना लिंगाधारित दिल्या जाणाऱ्या भूमिका समजून घेणे अत्यंत अगत्याचे आहे. "प्रत्येक स्त्री-पुरुषांची समाजातील भूमिका प्रत्येक वेळी वेगवेगळी असते उदाहरणार्थ स्त्री, आई, मुलगी, बहीण, सासू नणंद, शिक्षिका, अधिकारी, कामगार या सर्वांची भूमिका प्रत्येक वेळी विशिष्ट असते आणि या भूमिका निभावताना समाजही लिंगाधारित विशिष्ट भूमिकेची अपेक्षा ठेवून वागू लागतो. त्याचमुळे स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वासाठी संघर्ष उभा उभारावा लागला. पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी दर्जा दिला गेला त्यामुळे आपसूकच त्यांची दखल मानवी हक्क संदर्भात सर्व जगाला घ्यावी लागली"3.

पितृसत्ताक व्यवस्था म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था जिथे पुरुष स्त्रियांचे सर्व पद्धतींनी शोषण करतात. पितृसत्ताक पद्धती अनेक समाजव्यवस्थांत आजही रुजलेली दिसते, त्यामुळे स्त्रियांच्या शोषणास सर्रास अधिमान्यता मिळते. समाजातील सर्व घटकांमध्ये पुरुषी वर्चस्व असल्याने हा भेद कधी संपतच नाही; त्याला आव्हान दिल्याशिवाय आता तरणोपाय नाही. पितृसत्ताक व्यवस्था म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था जिथे पुरुष स्त्रियांचे सर्व पद्धतींनी शोषण करतात. त्यात त्यांना कमी दर्जाची वागणूक दिली जाते व सर्व निर्णय पुरुषांच्या हाती असतात आणि ही व्यवस्था संस्थात्मक असते. पुरुषप्रधानता व पुरुषांकडून नियंत्रण ही त्याची वैशिष्ट्ये सांगता येतील. पितृसत्ताक व्यवस्था म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था जिथे पुरुष स्त्रियांचे सर्व पद्धतींनी शोषण करतात. त्यात त्यांना कमी दर्जाची वागणूक दिली जाते व सर्व निर्णय पुरुषांच्या हाती असतात आणि ही व्यवस्था संस्थात्मक असते. पुरुषप्रधानता व पुरुषांकडून नियंत्रण ही त्याची वैशिष्ट्ये सांगता येतील.

"भारतामध्ये जेव्हापासून पितृसत्ताक पद्धतीचा उगम झाला तेव्हापासून स्त्री शोषणामध्ये वाढ झालेली दिसते. स्त्रीचे कुटुंबातील स्थान या कुटुंब पद्धतीने निश्चित केले होते. पितृसत्ताक पद्धती ने स्त्रियांना पुरुषांपेक्षा दुय्यम स्थान दिले होते.या पद्धतीला फुले यांनी आव्हान दिले त्यांनी स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखवून दिले जी स्त्री थोर महापुरुषाला जन्म देते, नऊ महिने पोटात सांभाळ करते, पुरुष लहान असताना सांभाळ करते, त्याचे संगोपन करते ती स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ असते"4. ही फुल्यांची स्त्रीवादी भूमिका हळूहळू मानवी मनात रुजू लागली, परंतु त्यासाठी बराच काळ खर्ची पडला. त्याच प्रमाणे फुले यांच्या विचारांनी प्रभावित होऊन डॉक्टर बाबासाहेबांनी स्त्रीमुक्तीसाठी कार्य केले त्यांनी पितृसत्तेच्या बंधनातून स्त्री मुक्त करण्यासाठी त्यांनी स्त्रियांना चळवळीत सामील करून घेतले पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही चळवळीत काम करू शकतात असा बाबासाहेबांना विश्वास होता "5

कुटुंब हे समाजाचे पायाभूत अंग आहे. कदाचित तीच सर्वात जास्त पुरुषप्रधान व्यवस्था आहे. पुरुष या संस्थेमध्ये प्रमुख आहे. कुटुंबाच्या आत तो स्त्रियांवर नियंत्रण ठेवतो. इथे एक गोष्ट लक्षात ठेवण्यासाखी आहे, की कुटुंबप्रमुख कुटुंबातील लहान मुले व पुरुषांवरदेखील नियंत्रण किंवा सत्ता गाजवत असतो. "आजची मुले उद्या कुटुंबप्रमुख होतील आणि स्त्रिया पदानुक्रमात पुरुषांच्या खालीच राहतील, याकरिता कुटुंब संस्थेत नियम कायदे बनविले जातात. यामध्ये पुरुष श्रेष्ठ व शोषक असतो. स्त्रिया खालच्या दर्जाच्या मानलेल्या असतात. पुढच्या पिढीला मूल्यशिक्षण देण्याचे काम ही कुटुंब संस्था करीत असते. यामध्ये आम्ही श्रेष्ठ-कनिष्ठ, पदानुक्रम आणि लिंगआधारित भेदभावांचा धडा शिकत असतो."6 प्रत्येक वर्तन, भूमिकेतून मुलांना धाक जमविण्याची, मर्दानगीची शिकवण मिळत असते, तर स्त्रियांना दबून राहण्याची व भेदभाव स्वीकारण्याची. आदर्श व सुसंस्कारी व्हावे, याकरिता लहानपणापासूनच संस्कार कुटुंबात केले जातात. घरातील कामे स्त्रियांनीच करावी आणि म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरी येऊन सर्व कामे करावी लागतात. पुरुष मात्र काही करीत नाही. त्यातूनच स्त्रियांविषयीच्या भेदभावपूर्ण वागणुकीला मान्यता मिळते. या वर्तनातूनच तो आत्मविश्वासी, साहसी पुरुष निर्माण होतो तर मुली भित्र्या व सहनशील बहुतेक आधुनिक धर्म पुरुषप्रधान आहेत, जो पुरुषांचे प्रभुत्व म्हणजे ती परमेश्वराची इच्छा आहे असे मानतो. प्राचीन काळातील स्त्रीचे देवी हे रूप हळूहळू संपुष्टात येऊन देवांनी त्याची जागा घेतली. बहुतेक धर्म उच्च वर्ग वा उच्च जातीच्या पुरुषांनी निर्माण केले, परिभाषित केले व तेच त्यांच्यावर नियंत्रणही ठेवतात. त्यांनी नीतिशास्त्र, व्यवहार आणि इतकेच काय, कायद्याची परिभाषा प्रस्थापित केली. स्त्रिया व पुरुषांना त्यांचे कर्तव्य व अधिकार सांगितले. दोघांमधील नाते निश्चित केले. याचा शासकीय धोरणावर परिणाम होताना दिसतो. उदा. लोकशाही देश असतानाही भारतात विवाह, घटस्फोट व उत्तराधिकाराच्या बाबतीत कुठल्याही व्यक्तीची कायदेशीर ओळख त्याच्या धर्मावर अवलंबून असते. मुस्लीम महिलांच्या तलाकसारख्या प्रश्नामध्ये आजही कायद्याने न्यायालयातून घटस्फोट होत नाही. तीन वेळा तलाक म्हणण्याला ला मान्यता दिसून येते. कुठल्याही प्रकारचा धर्म असू द्या, तो स्त्रियांना अपवित्र, कनिष्ठ आणि पापी मानत असतो. धर्मानेच व्यवहार आणि नतिकतेचे दुहेरी मापदंड बनविले आहेत, स्त्रियांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या हिंसेला धार्मिक कायदा योग्य मानतो. कट्टरतावादी सिद्धांताच्या आधारे असमान संबंधांना स्वीकृती आणि कायदेशीर दर्जाही मिळतो आणि समलिंगी संबंधांना मिळत नाही. स्त्रियांनी पतिव्रता असण्यासाठीही नियम असतात व अशा स्त्रियांना धार्मिक व चांगल्या मानण्याची पद्धत आहे.

अधिकांश देशांत कायदा व्यवस्था पुरुषप्रधान आहे. याचा अर्थ तो पुरुष आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गाच्या पक्षात आहे. कुटुंब विवाह आणि उत्तराधिकारीसंबंधी कायदे पुरुषसत्तात्मक संपत्ती नियंत्रणाशी जोडलेले आहेत. दक्षिण आशियाच्या सर्व कायदा व्यवस्थेत पुरुष कुटुंबाचे प्रमुख व स्त्रियाचे स्वाभाविक संरक्षक आणि संपत्तीचे मुख्य उत्तराधिकारी मानले जातात. विधिशास्त्र, कायदा, न्याय व्यवस्था यात न्यायाधीश आणि वकील सर्व जास्तकरून आपले दृष्टिकोन व व्यवस्थेत पुरुषप्रधान मानसिकता ठेवतात.

जेव्हापासून ज्ञान व शिक्षाप्राप्तीला औपचारिक व संस्थागत रूप मिळाले तेव्हापासून शिक्षणावर पुरुषांनी आपला ताबा जमविला आहे. अध्यात्म, धर्मशास्त्र, विधि, साहित्य, कला आणि विज्ञान अशी सगळी क्षेत्रे पुरुषी वर्चस्वाखाली आहेत. पुरुषांच्या या आधिपत्यामुळे स्त्रिया ज्ञान, अनुभव, योग्यता आणि शिक्षण यात मागे पडतात. अनेक संस्कृतीत स्त्रियांना प्राचीन धार्मिक साहित्याच्या अध्ययनापासून वंचित केले आहे. आजही काहीच स्त्रिया अशा आहेत ज्या धार्मिक साहित्य व संहितांची व्याख्या करीत आहेत. पुरुषांनी स्त्री शक्तीच्या प्रमुख प्रतीकांवर आपले अधिकार जमविले आणि त्याचे रूप बदलविले.

पितृसत्ताक व्यवस्थेच्या अंतर्गत आर्थिक संस्था, आर्थिक संपत्ती, आर्थिक व्यवहारांवर पुरुष नियंत्रण ठेवत असतात. स्त्रियांना उत्पादन कार्याचा ना मोबदला दिला जातो ना त्याला महत्त्व असते. स्त्रियांच्या मेहनतीतून जे अतिरिक्त उत्पादन होत असते किंवा बचत केली जाते तिला महत्त्व नसते, कौटुंबिक कामाचे तर मूल्यांकनच नसते आणि विशेष म्हणजे मुलांच्या पालनपोषणातील स्त्रीच्या भूमिकेला आर्थिक योगदानाच्या रूपात पाहिले जात नाही. ग्रामपंचायत ते संसदेपर्यंत सर्व स्तरांवर सर्व राजकीय संस्थेत पुरुषांचे वर्चस्व आहे. देशाचे भवितव्य निर्माण करणारे राजकीय पक्ष व संघटनांमध्ये फक्त मूठभर स्त्रिया आहेत. काही स्त्रियांनी राजकीय सत्ता मिळविली आहे (इंदिरा

गांधी, बेनझीर भुत्तो, रजिया सुलतान, झाशीची राणी इ.). तेव्हा कमीत कमी सुरुवातीला त्याचे कारण शक्तिशाली राजकीय पुरुष नेत्याशी तिचे संबंध असू शकतात; मग तो पिता किंवा पित्याच्या रूपात असू शकतो, त्या सत्तेवर होत्या परंतु खुर्ची सांभाळून पुरुषांद्वारे निर्धारित नियम व व्यवस्थेमध्ये काम करीत होत्या. आपण अनेक ठिकाणी पाहतो की सरपंचपदावर स्त्रिया असतात, परंतु नियंत्रण मात्र पुरुषाचे असते. संसदेत स्त्रियांचे प्रमाण काही देशांत सोडून जगात कुठेही दहा टक्क्यांपेक्षा जास्त नाही.

**➢ स्त्रियांचे अधिकार व मानवी हक्क**

भारतीय संविधानात मानवी हक्कांचा यथोचित सन्मान नि आदर केलेला आहे. मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संविधानात पुरेशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. याशिवाय राष्ट्रीय मानवी हक्क आयोगही मानवी हक्कांचे संरक्षण, जतन आणि संवर्धन करण्यासाठी कार्यरत आहे. समाजात कोणत्याही व्यक्तीसोबत भेदभावपूर्ण व्यवहार करणे हा एक प्रकारचा सामाजिक अन्याय आहे. सध्या जीवन जगण्यासाठी सामाजिक न्यायाची नितांत गरज आहे. भारतीय समाजात जात-धर्म-लिंग यावर आधारित विषमता दिसून येते. ही विषमता म्हणजे व्यक्तीच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होय. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने आणि निर्भयपणे जगता येणे, हे मानवी हक्कात अभिप्रेत आहे. हा हक्क व्यक्तीच्या विकासासाठी आणि आनंदासाठीही आवश्यक आहे. सर्व समाजांत व्यक्तीला सन्मानाने जीवन जगता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे हे मानवी हक्कांच्या सर्वव्यापी व्यवस्थेचा मुख्य उद्देश आहे. मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला जन्मतःच नैसर्गिकरीत्या प्राप्त होत असतात. कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक व्यक्तीला किमान जीवनस्तराची हमी देतात.

स्त्रिया जगाच्या लोकसंख्येचा अर्धा हिस्सा आहेत. असे असूनही स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन आणि लिंगाधारित हिंसा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भारतात करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार "दर २४ मिनिटांना एक स्त्री लैंगिक शोषण, दर ४३ मिनिटांना अपहरण आणि दर ५४ मिनिटांना बलात्काराची बळी पडत असते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दर आठ सेकंदांना एक स्त्री लैंगिक शोषणाला आणि सहा मिनिटांना एक स्त्री बलात्काराला सामोरी जात आहे"7. या आकडेवारीवरून जगभर स्त्रियांच्या मानवी हक्कांचे किती मोठ्या प्रमाणात हनन केले जाते याचे भयावह चित्र दिसून येते.

लिंगाधारित भेदभावाची कारणे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक असमानतेमध्ये दडलेली आहेत. "पुरुषप्रधान भारतीय संरचनेने स्त्रिया आणि पुरुषांच्या भूमिका असमान पद्धतीने निश्चित केल्या आहेत. जेव्हा स्त्रीकडे धन किंवा संपत्तीच्या रूपात भोगविलासाचे व उत्पादनाचे साधन म्हणून पाहिले जाते तेव्हा लैंगिक शोषणाची प्रवृत्ती तीव्रतेने उफाळून येते. स्त्रियांनीदेखील लिंगाधारित भेदभावाच्या परंपरांना कधी परिस्थितीवश, तर कधी अनिच्छेने वा स्वेच्छेने जीवनातील अपरिहार्य वास्तव म्हणून स्वीकारले आहे."८ मात्र, आता परिस्थिती बदलत आहे. आपल्या मानवी हक्कांबाबत स्त्रिया जागरूक होऊन त्याविरोधात आवाज उठवत आहेत. १९९५ मध्ये चीनमध्ये जागतिक महिला परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत प्रामुख्याने स्त्रियांच्या मानवी हक्कांबाबतच्या जागरूकतेवर भर देण्यात आला होता.स्त्रियांच्या मानवी हक्काच्या हननाची प्रक्रिया स्त्री भ्रूणहत्या करून सुरू होते. "भारतात भ्रूण तपासणी सुरू झाल्यावर १९८४ मध्ये ४० हजार भ्रूणहत्या झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या होत्या."9 विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच स्त्री-पुरुष जन्मदरात सातत्याने ऱ्हास होताना दिसून येत आहे. अशा प्रकारे स्त्रियांचा जीवन जगण्याचा मूलभूत हक्कही हिरावला जातो. ज्या मुली वाचतात त्यांना पुढे आयुष्यभर आपल्या मानवी हक्कांच्या पूर्ततेसाठी संघर्ष करावा लागतो. त्यांना कुटुंबात मुलगी म्हणून भेदभावाची वागणूक दिली जाते. कुटुंबातल्या मुलाला जो सन्मान आणि आदर प्राप्त होतो तो मुलीच्या वाटेला येत नाही. मुलीला ओझे समजून तिच्या शिक्षणावरचा खर्च व्यर्थ समजला जातो. म्हणूनच स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने कमी आहे. शाळा सोडण्याच्या प्रमाणात मुली आघाडीवर आहेत. लिंगाधारित भेदभावात आहारविषयक भेदभावाचाही समावेश आहे. नोबेल पुरस्कार विजेते प्रा. अमर्त्य सेन यांनीही पोषणमूल्यांच्या अभावामुळे आई तसेच बालिकांच्या मृत्युदरात वाढ झाल्याचे निदर्शनास आणले आहे. स्त्रियांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी निगडित मुद्द्यावरही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. अकाली कौटुंबिक जबाबदाऱ्या लादल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत नाही. भारतात बालविवाह

हादेखील स्त्री शोषणाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. कामाच्या ठिकाणीही स्त्रियांच्या मानवी हक्कांचे सहजपणे हनन होते. स्त्री व पुरुषाला समान कामाचे समान वेतन न देणे, स्त्रियांचे शारीरिक, मानसिक शोषण करणे असे प्रकार घडत असतात. पुरुषसत्ताक पद्धती स्त्रियांसाठी कमालीची घातक आहे. स्त्रियांना दुहेरी त्रास सोसावा लागतो. घरातील कामे आणि बाहेरची कामेही (नोकरी, व्यवसाय) त्यांनाच करावी लागतात. परिणामी स्त्रियांमध्ये हृदयाशी संबंधित विकार वाढताना दिसत आहेत. विशेषत: शहरी भागातल्या स्त्रियांमध्ये. समानता, न्याय आणि मानवी हक्कांवर आधारित समाजाच्या स्थापनेसाठी विकासाच्या प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग आवश्यक आहे. आता स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन होऊ नये म्हणून आणि त्यांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या तरतुदीनुसार स्त्रियांवरील हिंसाचाराला मानवी हक्काचे उल्लंघन समजण्यात येते. ८ मार्च ला जागतिक महिला दिन साजरा केला जातो. व्हिएन्ना येथे जून १९९३ मध्ये भरलेल्या संमेलनातही स्त्रियांच्या मानवी हक्कांबाबत आवाज उठवण्यात आला. तसेच संयुक्त राष्ट्र संघानेही स्त्रियांच्या विरोधातला हिंसाचार संपुष्टात आणण्याची घोषणा केली. या घटना स्त्रियांच्या मानवी हक्कांबाबत जागृती होत असल्याचे निदर्शक आहेत. भारतात १९९४ मध्ये स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा करण्यात आला. २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा अमलात आला, पण हे उपाय फारसे परिणामकारक ठरलेले आढळत नाही कारण कायदे असले तरी ते राबवणाऱ्या यंत्रणेची मानसिकता पुरुषप्रधान आहे. समाजाची मानसिकता सरंजामी आहे. म्हणून तर आजही स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात मंदिरात जाता येत नाही. शनी शिंगणापूरच्या मंदिरात तर दर्शनही घेता येत नाही. हे सर्व काही नसून स्त्रियांच्या मानवी हक्कांचे सरळ-सरळ उल्लंघन आहे. कोणत्याही देशाची संस्कृती त्या देशातल्या स्त्रियांना कशी वागणूक दिली जाते यावर ठरत असते. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे, असे आपण म्हणू शकतो का? आपल्याला रूढीग्रस्त सनातनी विचारातून, विषमताग्रस्त मानसिकतेतून बाहेर येऊन उदारमतवादी, समानतावादी आणि विकासाभिमुख प्रागतिक दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज आहे. स्त्रियांच्या मानवी हक्कांचे जतन, संरक्षण आणि संवर्धन झाले तरच देश सामाजिक-आर्थिक व राजकीयदृष्ट्या सक्षम होईल. आपण सर्व जण कोणत्याही परिस्थितीत स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन होणार नाही, यासाठी सदैव प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.

भारतीय समाज राष्ट्रीय स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा नव्हता त्याचप्रमाणे जगातील देश आहे त्याला अपवाद नव्हते याची दखल कुणी घेतली नव्हती. एकोणिसाव्या शतकात पहिल्या महायुद्धानंतर मानवी अधिकारांचे आंतरराष्ट्रीय मापदंड प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलली गेली, परंतु मानवी हक्काच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी व्यापक आंतरराष्ट्रीय व्यवस्थाही मात्र विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच स्थापित झाली. प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रे म्हणजे, यांच्या विशेष समित्या व शासकीय पातळीवर विविध राष्ट्रांना बांधणाऱ्या संघटना यांच्यामुळे हे कार्य होऊ शकले. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व कार्यक्रमांमध्ये स्त्रियांच्या मानवी हक्कांना सामावून घेण्यात आले. विशेष करून स्त्रियांच्या मानवी हक्काचे उल्लंघना बाबतच्या तक्रारींमध्ये लक्ष घालण्यासाठी यंत्रणा प्रस्थापित करण्यात आली. हे धोरण भारताने ही अवलंबिले आणि त्याचा फायदा समस्त स्त्रीवर्गाला भारतात झाला. स्त्रियांचा अभ्यास करताना त्यांचे समाजातील स्थान, आर्थिक सुरक्षितता बघणे आवश्यक आहे. फक्त चार दशकांपूर्वी स्त्रीयांनी पुरुषांच्या गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवला त्यांची आपल्या अस्तित्वासाठी स्वाभिमानाची लढाई सुरू झाली. आताचे जे स्थान स्त्रीचे आहे ते तिला अलीकडेच मिळाले आहे, परंतु अजूनही संपूर्ण शृंखला सुटल्या नाहीत. अजूनही लढाई सुरूच राहणार आहे. "भारतीय संविधानात महिलांना पुरुषाबरोबर हक्क आणि स्वातंत्र्य देण्यात आले आहेत, परंतु आज मात्र वकील, डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापिका, मंत्री, राष्ट्रपती यासारख्या मोठ्या पदावर महिला असताना सुद्धा त्यांना समान हक्क अधिकार स्वातंत्र्य मिळत नसून अनेक महिला घराघरात अत्याचाराला बळी ठरत आहे. भारतीय संविधानात लिंग या आधारावर भेदभाव करण्यास मनाई आहे. भारतीय संविधान अनुच्छेद 51 मध्ये मौलिक कर्तव्या मध्ये स्त्रियांसाठी सन्मानाची भावना प्रकट केली आहे. महिलांना अधिकार मिळण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत. महिलांच्या हितासाठी विशेष विवाह अधिनियम 1956, हुंडाविरोधी अधिनियम 1961, बालविवाह अधिनियम 1976, समान परिषद अधिनियम 1976, इत्यादी अधिनियम महिलांची ती सुधारण्यासाठी करण्यात आली आहे"10 म्हणूनच आधुनिक कालखंडात स्त्रियांना त्यांच्या स्थितीची जाणीव झाली. तिला तिचे

अस्तित्व कळायला लागले आव्हानांना तिने स्वीकारले व तिचे स्वबळात परिवर्तन झाले. एकंदरीत स्त्रीच्या प्रगतीचा आलेख उंचावताना आपणास दिसून येतो.

## निष्कर्ष

भारतात पितृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती या पद्धतीत पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ मांनली जात होती. स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार तिची दयनीय अवस्था दर्शविणारी आहेत. स्त्रीच्या अस्तित्वाच्या संकुचित यौनिक रूपाला पुरुषांवर अवलंबित करून त्याच्या आधारे धर्मशास्त्राचे निर्माण केले गेले आहे.याच आधारावर आम्ही समाजामध्ये पुरुषांची प्रतिमा संपूर्ण व शक्तिशाली मानतो व स्त्रियांची अपूर्ण, अशक्त अबला. अशा काल्पनिक रूपकांना आधार मानून पुरुषांनी आपल्या नजरेने प्रत्येक गोष्ट समजविली आणि ते पूर्ण सृष्टीचे केंद्र बनले.पुरुषप्रधान शिक्षण आणि ज्ञान पितृसत्ताक विचारधारेला खतपाणी घालून पोसतात. असे शिक्षण स्त्री व पुरुषांच्या विचार व आकलन शक्तीत भिन्नता निर्माण करते, ज्यामुळे स्त्री आणि पुरुष वेगवेगळ्या पद्धतीने व्यवहार करतात, विचार करतात आणि आकांक्षा बाळगतात, कारण त्यांना स्त्री-पुरुष भेदभावाची भाषा शिकवली जाते. स्त्रियांबाबत होणारी हिंसा ही या व्यवस्थेच्या नियमानुसार योग्य असते; ही एक मानसिकता आहे आणि ती लादलेली असते.गरज आहे ही मानसिकता बदलण्याची, परिवर्तनाची. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. आता त्यांना त्यांच्या अस्तित्वाची, हक्काची जाणीव व्हायला सुरुवात झाली आहे . एकविसाव्या शतकात मानवी अधिकारांमध्ये महिलांच्या हक्कासंदर्भात गावापासून तर देशपातळीवर जाणीव होण्यास सुरू झाली. त्यातूनच महिलांना त्यांच्या संविधानात्मक हक्कांना मान्यता मिळत गेली आणि भारतात समस्त स्त्री वर्गाची सर्वच क्षेत्रात प्रगती झाली. हे अत्यंत महत्त्वाचे आहे स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी याहून अधिक चांगली पावले उचलण्याची भारतीयांची मानसिकता होणे गरजेचे आहे याकरिता या व्यवस्थेला आव्हान दिले पाहिजे, तेव्हाच स्त्री-पुरुष भेदभाव मिटेल व स्त्रियांविरोधातील हिंसाचाराला आळा बसेल.

## संदर्भ


*Edwin Robert Anderson Seligman , The Encyclopaedia of the Social Sciences, Part 2 , Macmillan Publishers Ltd ,1967, Page No. 1620,1621*

*गार्गे स.मा., भारतीय समाजविज्ञान कोष, भाग २ मेहता पब्लिशिंग हाऊस, पृ.क्र. 302*

*ॲड. उमाळ वसंत, पुरूष सत्ताक मुल्य व्यवस्था व महिलांचा दुयम दर्जा, दैनिक देशोन्नती, दिनांक १५ मार्च २०१५, पृ.क्र.४ व ५*

*फडके य.दी., संपादक महात्मा फुले समग्र वाङ:मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, 1991, पृ.क्र446*

*मून वसंत व नरके हरी, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे खंड 18, भाग 3 , पृ.क्र 142.*

*डॉ म्हेत्रे स्मिता, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, 2011, पृ.क्र 62.*

*https://divyamarathi.bhaskar.com/news/EDT-pro-5190660-NOR.html*

*https://avinashbhondwe.wordpress.com/tag/indian-women/ Dt 28th March 2022*

*शरयु अनंतराम. अनु. उमा वडसे, भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन मुबंई, १९८७, पृ.क्र.22.*

*डॉ दसाई संभाजी, महिला सबलीकरण,प्रशांत पब्लीकेशन, जळगाव 2014, पृ.क्र 296*